**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

"(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ जमनालाल बजाज प्रशासकिय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर,
विद्यापीठ कॅम्पस चौकते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपूर ४४००३३


क्र. रातुमनावि/विद्या/वि.शु/२१/१९२ दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१

## अधिसूचना

संदर्भः– १. क्र. रातुमनावि/विद्या/वि.शु/२०/१६४ दिनांक ३१ जुलै,२०२०
२. क्र. रातुमनावि/विद्या/वि.शु/२०/१७३ दिनांक १३ ऑगस्ट,२०२०
३. क्र. रातुमनावि/विद्या/वि.शु/२०/३७५ दिनांक १३ जानेवारी,२०२१

सर्व संबंधिताच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, विद्यापीठ संचालीत महाविद्यालय /विभाग, संलग्नीत महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्थेतील राबविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू करण्याबाबत शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे परिपत्रक क्र.संकिर्ण २०२१/प्र. क.६/विशि–३दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ विद्यापीठास प्राप्त झाले होते. सदर शासन परिपत्रक मा. कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्यावतिने स्विकृत करून त्यात असलेल्या अटिनुसार दिनांक ९ फेब्रुवारी,२०२१ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेत पुढिल कार्यवाही घेण्याच्या दृष्टिने सादर केला होता. यावर विद्यापरिषदेने खालील प्रमाणे निर्णय घेतले असून त्यानूसार सर्व विद्यापीठ संचालीत महाविद्यालय /विभाग, संलग्नीत महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त परिसंस्थेतील नियमित वर्ग खालील प्रमाणे दिनांक १५ फेब्रुवारी,२०२१ पासून सुरू करावे.

१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार,जागेची उपलब्धता पाहून, ५०टक्के पर्यंत विद्यार्थ्यांना रोटेशन पध्दतीने वर्गात प्रवेश देण्यात यावा.

२) चालू वर्षी कोव्हिड–१९ मुळे निर्मान झालेली परिस्थिती लक्षात घेता (प्रत्येक विद्यापीठांच्या आदेशातील (Ordinances) तरतुदींनुसार विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के बंधनकारक नसावी.) विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सक्ती करण्यात येऊ नये.

३) शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची कोव्हिड–१९ करिता टेस्ट करण्याच्या आवश्यकतेबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी महाविद्यालयाचे प्राचार्य /विभाग प्रमुखांनी आपल्या स्तरावर चर्चा करावी.

४) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम किती कमी करावयाचा याबाबत विद्यापरिषदेच्या निर्णयाप्रमाणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील किती अभ्यासक्रम पुर्ण झाला याचा अहवाल विद्या विभागात तात्काळ सादर करावा.

५) वसतीगृहे/महाविद्यालये अनेक दिवस बंद अवस्थेत असल्याने संबधित महाविद्यालयाचे प्राचार्यांनी व संबंधितानी त्यांचे इलेक्ट्रिक/सेफ्टी ऑडिट करून घ्यावे.

६) कोव्हिड–१९ बाबत केंद्र शासन व राज्यशासनाच्या मार्गदर्शक सूचनेचे पालन करण्यात यावे तसेच,विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ५ नोव्हेंबर,२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे.

(डॉ.अनिल हिरेखन)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:**

१. विद्यापीठाशी संलग्नीत/संचालीत महाविद्यालयातील सर्व प्राचार्य व शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख
२. मा. वित्त व लेखा अधिकारी,
३. मा. संचालक, नवोपक्रम,नवसंशोधन व साहचर्य
४. मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
५. विद्यापीठाचे सर्व अधिकारी,
६. मा. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक,
७. मा. प्र-कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक,
८. मा.कुलसचिवांचे स्वीय सहाय्यक,
९. श्रीमती सिमा प्रभारी, माहितीशास्त्र.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर

(संजय कावेकर)
उपकुलसचिव (विद्या)अ.१